**नि.क्र.१८**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०६ याची साक्ष</u> -**
**मी याद्वारे असे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :**

माझे नांव : फ्रान्सीस मारियन फर्नांडिस
वय सुमारे : ५१ वर्षे, धंदा - नोकरी ,
राहणार : कावलेवाडी रानबांबुळी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग

-----------------------------------

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपास सहा.सरकारी वकील श्री. जी. आर. माजगावकर यांचे मार्फत -</u>**

**०१.** माझी भाची सेलीना फर्नांडिस हि जैतापकर कॉलनी रानबांबुळी येथे राहायची. मला दिनांक ०१/०६/२०२५ रोजी सेलीनाचा भाऊ जॉन्सन याने रात्री ०८.०० वाजता फोन केला व मला सांगितले की, सेलीना व तिचा मित्र जोसेफ गाडीवरून कोणत्यातरी कार्यक्रमासाठी जात असताना आयशर शो-रूमच्या समोर ॲक्सीडेंट होवुन ते पडलेले आहेत व तो त्यांना सिव्हील हॉस्पीटल सिंदुधूर्ग येथे जात आहे. मी सिव्हील हॉस्पीटल मध्ये गेलो. सेलीनाच्या डोक्याला बॅन्डेज केलेले होते. डॉक्टर म्हणाले की, तिला पुढील उपचाराकरिता जी.एम.सी.गोवा येथे न्यावे लागेल. आम्ही रात्री १०.३० च्या सुमारास तिला सिव्हील हॉस्पीटल मधुन हालवले, जी.एम.सी.गोवा येथे नेले, तेथे डॉक्टरांनी तिची परिस्थीती अतिशय नाजुक असल्याचे सांगितले. तिला तेथे ॲड्मीट केले. मी तिच्या जवळ बसुन होतो. दुस-या दिवशी सकाळी ०७.३० ते ०८.०० च्या दरम्यान तिचा मृत्यु झाला.

**०२.** पोलीसांनी दिनांक ०६/०६/२०२५ रोजी माझेकडे चौकशी केली होती. मी जोसेफला ओळखतो. तो आज कोर्टात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**<u>आरोपी हजर, आरोपीचे वकील गैरहजर असल्याने आरोपीच्या नि.क्र.१७ वरील मुदत अर्जावरून उलट तपास तहकुब.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

ठिकाण :- ओरोस
दिनांक :- ०७/०५/२०२६.

**( ए.जी.देशिंगकर )**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग-ओरोस.